Jan 2018


UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143


# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages


Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | महिलांचा आर्थिक विकास आणि उद्योजकता | डॉ.सतीश बाबुराव डोंगे | 70 |
| 17 | ॲरिस्टॉटलच्या 'नैतिक सदगुण' संकल्पनेचा अन्वयार्थ | पंडगे संतोष रमेशराव | 74 |
| 18 | ग्रामीण साहित्य संकल्पना व स्वरूप | प्रा. डॉ. हनुमंत तुकाराम माने | 77 |
| 19 | विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा विकासासाठी कार्यक्रमनिर्मितीचा अभ्यास | प्रा.मरेवाड प्री.पी. | 81 |
| 20 | स्त्री उत्थानातील डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या कार्य व चळवळीचे योगदान | डॉ.पी.जी. राठोड | 86 |
| 21 | नव्वदोत्तरी स्त्रीवादी कथालेखनातील स्त्रीजीवन | प्रा.डॉ.लक्ष्मण ना.वाघमारे | 89 |
| 22 | 'अण्णा भाऊ साठे यांच्या साहीत्यातील आंबेडकरी विचार' | डॉ. आर. एस. पारवे | 92 |
| 23 | पश्चिम महाराष्ट्र का लिगांयत समाज : एक अध्ययन | डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव | 97 |
| 24 | ''उपेन्द्रनाथ अश्क के नाटक और रंगमंच।'' | डॉ. प्रदीप सूर्यवंशी | 100 |
| 25 | योगदर्शनातील मानसशास्त्र | प्रा. भुसारे जी.एन. | 103 |

CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol II ; Jan. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# 'अण्णा भाऊ साठे यांच्या साहीत्यातील आंबेडकरी विचार'

**डॉ. आर. एस. पारवे**
संशोधक मार्गदर्शक व विभाग प्रमुख, इतिहास विभाग, दयानंदकला महाविद्यालय, लातूर

-----------------(22)-----------------

अण्णाभाऊ साठे यांचा जन्म ०१ ऑगस्ट, १९२० व मृत्यू १८ जूलै १९६९. या ४९ वर्षाच्या काळात अण्णाभाऊच्या आयुष्यामण्ये अनेक चड उतार, दु:ख कष्ट दारिद्रय त्यांनी अनुभवले. त्यातूनच त्यांच्यातील कार्यकर्ता व कलावंताची जडणघडण झाली. त्यांचे सुरूवातीचे १० वर्षाचे आयुष्य वाटेगाव ता. वाळवा जि. सांगली येथे तर नंतरचे आयुष्य मुंबई मध्ये गेले. वयाच्या अकराव्या वर्षी आई वडिलाबरोबर वाटेगावाहून पायी चालत मुंबईत आले. प्रचंड हाल अपेष्ठा कष्ट, हमाली, गिरणी कामगार या पद्धतीने मुंबईत त्यांच्या जिवनाची सुरूवात झाली. या परिस्थीतीमुळेच ते तारूण्यात पदार्पण करण्यापुर्वीच ते कार्ल मार्क्सच्या साम्यवादी विचाराकडे आकर्षित झाले. अण्णाभाऊ शेवटपर्यंत कम्यूनिष्ठ पक्षात राहिले.

१९२० नंतर मुंबई मधून अनेक वेगवेगळ्या विचारांच्या चळवळी चालू झाल्या होत्या. गांधीजीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याची चळवळ होती. कम्यूनिष्ठांच्या नेतृत्वाखाली कामगारांची चळवळ होती, डॉ. आंबेडकरांची दलीत-अस्पृश्य उध्दाराची चळवळ चालू होती अण्णाभाऊं साठें हे दलीत अस्पृस्पृतेचे चटके सहन करत असले तरी मुंबईत गेल्यावर वयाच्या अकराव्या वर्षापासून त्यांनी जो अनुभव घेतला पोटाची खळगी भरण्यासाठी अण्णाभाऊंना वयाच्या अकराव्या वर्षापासून जो संघर्ष करावा लागला त्यामळे साहजीकच अण्णाभाऊ कम्यूनिष्ठ पक्षाकडे आकर्षीत झाले. १९३४-३५ मध्ये वयाच्या चौदाव्या-पंधराव्या वर्षी अण्णाभाऊ मार्क्सवादी विचाराकडे आकर्षित झाले होते. १९४२ मध्ये कम्युनिष्ट पक्षाचे पूर्ण वेळ प्रचारकही झाले होते.[१] मार्क्सवाद हा आर्थिक विषमतेच्या विरोधात संघर्ष करावयास सांगतो. तर आंबेडकरवाद हा सामाजिक विषमतेच्या विरोधात संघर्ष करावयास सांगतो. मार्क्सवादी पक्षांनी, कार्यकत्याची, कलावंताची कामगाराची एकजूट करून भांडवलशाही समाजरचनेच्या विरोधात लढे उभारले तर आंबेडकरवादी पक्षांनी , कार्यकर्त्यांची, कलावंतांची, दलितांची एकूट करून विषमतेवर आधारीत समाजरचनेच्या विरोधात लढे उभारले. अण्णाभाऊ साठे मार्क्सवादी होऊन लाल बावटा कलापथकांचे संस्थापक, शहीर व सक्रिय कार्य करत होते. अण्णाभाऊ कम्युनिष्ठ पक्षाचे सकीय कार्य करत होते. अण्णाभाऊ कम्युनिष्ठ पक्षात असले तरी डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वावर विचारावर, कार्यावर, चळवळीवर अण्णाभाऊ साठे आस्था बाळगून होते. म्हणूनच अण्णाभाऊच्या साहीत्यातून अण्णाभाऊवरील मार्क्सवादाचा सखोल प्रभाव असला तरी परंतु त्या बरोबरच अण्णाभाऊंचा 'सापळा', उपकराची फेड, वळणं, 'बुध्दाची शपथ' या सारख्या कथा साहित्यातून आंबेडकरी विचार लक्षात येतो.[२] अण्णाभाऊ कम्यूनिष्ठ होते तरी त्यांच्या अनेक कथा कादंबऱ्यातून आंबेडकरी विचार स्पष्ट होते.

अण्णाभाऊंनी लिहलेली, १४ कथासंग्रह, ३५ कादंबऱ्या ०१ कविता, १० पोवाडे, १६ लोकनाट्य व नाटक, एकप्रवास वर्णन एवढे साहित्य प्रकाशित झालेले आहे. त्यांच्या सात कादंबरीवर सात चित्रपट निघाले आहेत. म ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता व सामाजिक न्यायाच्या विचाराची व परिवर्तनाची चळवळ अण्णाभाऊंनी आपल्या साहीत्य निर्मितीतून पुढे नेली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना डॉ. बाबासाहेबांनी प्रेरणा दिली. विचार दिला त्या विचारातून 'देशभक्त घोटाळे' या लोकनाट्यातील गीतात अण्णाभाऊ लिहितात,

"जग बदल घालुनी घाव | सांगुन गेले मला भीमराव|
गुलामगीरीच्या या चिखलात | रूतून बसला का ऐरावत |
अंग झाडुनी निघ बाहेरी | घे निनीवरती धाव ||
धनवंतानी अखंड पिळले | धर्मांधानी तसे छळले |

CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol II, Jan. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

आंबेडकरांची दलीत-अस्पृश्य उध्दाराची चळवळ चालू होती. अण्णाभाऊ साठे हे देखील दलीत-अस्पृश्यतेचे चटकेसहन करत असले तरी मुंबईत गेल्यावर वयाच्या अकराव्या वर्षापासून त्यांनी पोटाची खळगी भरण्यासाठी अण्णाभाऊंना जो संघर्ष करावा लागला त्यामुळे ते साहजिकच कम्युनिष्ठ विचाराकडे आकर्षित झाले. १९४२ पासून ते मार्क्सवादी पक्षाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते झाले. अण्णाभाऊ कम्युनिष्ठ पक्षात असले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वावर, विचारावर, कार्यावर व चळवळीवर अण्णाभाऊंची प्रचंड निष्ठा व आस्था होती. अण्णाभाऊंनी आयुष्यभर कम्यूनिष्ठ पक्षाचे काम करत असतानाच साहित्य निर्मिती केली. वास्तव परिस्थितीवर आधारीत साहीत्य लिहीले. १४ कथासंग्रह, ३५ कादंबऱ्या, १ कविता, १० पोवाडे, १६ लोकनाट्य व नाटक, एक प्रवास वर्णन एवढे साहीत्य अण्णाभाऊंचे प्रकाशित आहे. अण्णाभाऊच्या साहित्यातून त्यांच्यावरील मार्क्सवादाचा सखोल प्रभाव स्पष्ट होत असला तरी त्यांच्या साहित्यातून आंबेडकरवादी विचार देखील प्रकर्षाने जाणवतात. अण्णाभाऊंच्या सापळा, उपकराची फेड, वळणं, बुध्दाची शपथ, स्मशानातील सोनं, गावगाडा इ. साहित्यातून अण्णाभाऊंनी आंबेडकरवादी विचार समाजा समोर मांडलेले आहेत. डॉ. आंबेडकरांची समता व सामाजिक न्यायाची, विचारांची चळवळ, अण्णाभाऊंनी आपल्या साहित्य निर्मितीतून पुढे नेली. अण्णाभाऊंना डॉ. आंबेडकरांकडून प्रेरणा मिळाली, विचार मिळाला असे स्वतः अण्णाभाऊ सांगतात. 'देशभक्त घोटाळे' या लोकनाट्यातील गीतात अण्णाभाऊ लिहीतात, 'जग बदल घालुनी घाव | सांगुलन गेले मला भिमराव | डॉ. आंबेडकरांचे विज्ञानवादी विचार, शिक्षणाचे महत्त्व जातीयत्तेचे उच्चाटन स्वाभिमान सामाजिक परिवर्तन हे सर्व बाबासाहेबांचे विचार अण्णाभाऊंनी आपल्या साहीत्यातून समाजा समोर मांडलेले आहेत.

## संदर्भ ग्रंथ

१) डॉ. अविनाश सॉंगोलेकर- अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवाद व मार्क्सवाद - संपादक प्रा. विजयकुमार जोखे- अण्णाभाऊ साठे चरित्र आणि कार्य नाग-नालंदा प्रकाशन, इस्लामपूर २०१५ पान क्र. १५२
२) कित्ता पान क्र. १५३
३) कित्ता पान क्र. ११०
४) प्रा. विठ्ठल भंडारे- अण्णाभाऊ साठे व समाज परिवर्तन, अस्मिता प्रकाशन, नांदेड, २००८ पान क्र. १६
५) कित्ता पान क्र. २४
६) तुकाराम हरगीले - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे वारसदार अण्णाभाऊ साठे, प्रबोधन प्रकाशन, नांदेड, २००६ पान क्र. ०२
७) प्रा.डॉ. प्रकाश कुंभार-अण्णाभाऊ साठे यांच्या कथेतून अभिव्यक्त झालेला गावगाडा-संपादक आसाराम गायकवाड-अण्णाभाऊ साठे संदर्भ ग्रंथ झेप कशान, नाशिक- १९९६ पान क्र. १४०
८) कित्ता पान क्र. १४१
९) कित्ता पान क्र. १४१
१०) तुकाराम हरगीले - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे वारसदार अण्णाभाऊ साठे, प्रबोधन प्रकाशन, नांदेड, २००६ पान क्र. १३
११) कित्ता पान क्र. ४०

Current Global Reviewer

ISSN 2319-8648

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

UGC Approved Journal
Sr. No. 64310



Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION
Latur
Publisher
Shaurya Publication

www.rjournals.co.in